



रयत शिक्षण संस्थेचे

# महात्मा फुले महाविद्यालय पिंपरी, पुणे -१७

## राष्ट्रीय सेवा योजना

माझी वसुंधरा

राष्ट्रीय सेवा योजना
NATIONAL SERVICE SCHEME
NOT ME BUT YOU

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# राष्ट्रीय सेवा योजना

जागतिक महिला दिन

## जागतिक महिला दिन कार्यक्रम अहवाल

## ८ मार्च २०२२

***कार्यक्रम अधिकारी ***

१.प्रा. संदीप पु. नन्नावरे        २. डॉ. मिलिंद भंडारे        ३. डॉ. भारती यादव

*प्राचार्य *

## डॉ. पांडुरंग गायकवाड

**महात्मा फुले महाविद्यालय पिंपरी, पुणे -१७**





रयत शिक्षण संस्थेचे,

# महात्मा फुले महाविद्यालय, पिंपरी पुणे-१७.

## राष्ट्रीय सेवा योजना व महिला मंच आयोजित

## जागतिक महिला दिनानिमित्त

## महिला सक्षमीकरण (विशेष व्याख्यान)

**Zoom Online Platform**

## कार्यक्रम पत्रिका

वेळ :सकाळी १०.००  दि. ८ /०३/२०२२

---

- प्रास्ताविक व स्वागत : प्रा.मृणालिनी शेखर
- प्रमुख पाहुण्यांचा परिचय : डॉ.वैशाली खेडकर
- प्रमुख अतिथी मार्गदर्शन : मा.प्राचार्य डॉ. प्रतिभा गायकवाड
  ( सहसचिव,रयत शिक्षण संस्था सातारा )
- अध्यक्षीय मनोगत : मा. प्राचार्य डॉ. पांडुरंग गायकवाड
  (महात्मा फुले महाविद्यालय, पिंपरी पुणे-१७.)
- आभार : प्रा.शहाजी मोरे
- सूत्रसंचालन : डॉ. कामायनी सुर्वे
- तांत्रिक सहाय्य : प्रा. प्रीती नेवसे

जागतिक महिला दिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभाग व महिला विकास मंच यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिन ऑनलाइन पद्धतीने विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाला मार्गदर्शक म्हणून अण्णासाहेब आवटे महाविद्यालय मंचर येथील राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. वैशाली सुपेकर मॅडम यांनी स्त्री उद्धाराची चळवळ व आजच्या काळातील स्त्रीचे जबाबदाऱ्या व कर्तव्य या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच स्त्रीवादी चळवळीचा इतिहास त्यांनी थोडक्यात मांडला संपूर्ण अमेरिका आणि युरोपसहित जवळजवळ संपूर्ण जगभरच्या स्त्रियांना विसाव्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत मतदानाचा हक्क नाकारलेला होता. पुरुषप्रधान व्यवस्थेतील स्त्री-पुरुष विषमतेचे हे एक ढळढळीत उदाहरण होते.१८९० मध्ये अमेरिकेत मतदानाच्या हक्कासंदर्भात `द नॅशनल अमेरिकन सफ्रेजिस्ट असोसिएशन' स्थापन झाली. परंतु ही असोसिएशनसुद्धा वर्णद्वेषी आणि स्थलांतरितांविषयी पूर्वग्रह असणारी होती. १९०७ साली स्टुटगार्ड येथे पहिली आंतरराष्ट्रीय समाजवादी महिला परिषद भरली. त्यामध्ये क्लारा झेटकिन या कम्युनिस्ट कार्यकर्तीने `सार्वत्रिक मतदानाचा हक्क मिळवण्यासाठी संघर्ष करणे हे समाजवादी स्त्रियांचे कर्तव्य आहे.' अशी घोषणा केली. ८ मार्च १९०८ रोजी न्यू यॉर्कमध्ये वस्त्रोद्योगातील हजारो स्त्री-कामगारांनी रुटगर्स चौकात जमून प्रचंड मोठी ऐतिहासिक निदर्शने केली. दहा तासांचा दिवस आणि कामाच्या जागी सुरक्षितता ह्या मागण्या केल्या. या दोन मागण्यांबरोबरच लिंग, वर्ण, मालमत्ता आणि शैक्षणिक पार्श्वभूमीनिरपेक्ष सर्व प्रौढ स्त्री-पुरुषांना मतदानाचा हक्क मिळावा अशी मागणीही जोरकसपणे केली. अमेरिकन कामगार स्त्रियांच्या या व्यापक कृतीने क्लारा झेटकिन अतिशय प्रभावित झाली. १९१० साली कोपनहेगन येथे भरलेल्या दुसऱ्या आंतरराष्ट्नीय समाजवादी महिला परिषदेत, ८ मार्च १९०८ रोजी अमेरिकेतील स्त्री-कामगारांनी केलेल्या ऐतिहासिक कामगिरीच्या स्मरणार्थ, ८ मार्च हा `जागतिक महिला-दिन' म्हणून स्वीकारावा असा जो ठराव क्लाराने मांडला, तो पास झाला. यानंतर युरोप, अमेरिका वगैरे देशात सार्वत्रिक मतदानाच्या हक्कासाठी मोहिमा उघडल्या गेल्या. त्यांचा परिणाम म्हणून १९१८ साली इंग्लंडमध्ये व १९१९ साली अमेरिकेत या मागण्यांना यश मिळाले. आजच्या कळतही स्त्री अनेक क्षेत्रातयशस्वी वाटचाल करीत आहे. तिच्या जबाबदाऱ्या वाढलेल्या आहे. पुरुषाशी खांद्याला खांदा लावून ती यशस्वी झाली आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पांडुरंग गायकवाड साहेब होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात महिलांना त्यांच्या हक्काची जाणीव व्हावी, त्यांचे जीवन सुधारावे यासाठी ८ मार्चला जागतिक महिला दिन साजरा केला जातो. आज महिला चौकटीबाहेर पडून जगाला गवसणी घालत आहेत. खेळापासून मनोरंजनापर्यंत, राजकारण, लष्कर, संरक्षण मंत्रालयापर्यंत विविध मोठ्या भूमिका त्या बजावत आहेत. त्यामुळे त्यांच्या कामाची दखल आता सर्व पातळीवर घेतली जात आहे. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. मृणालिनी शेखर यांनी

केले.पाहुण्याचा परिचय डॉ.वैशाली खेडकर यांनी केला तर आभार महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.शहाजी मोरे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. कामायनी सुर्वे यांनी केले.







Programme Officer
National Service Scheme
Mahatma Phule College,
Pimpri,Pune -17.

MAHATMA PHULE MAHAVIDYALAYA PIMPRI PUNE-17

Principal,
Mahatma Phule Mahavidyalaya,
Pimpri Pune-17

जागतिक
महिला
दिन